Sakal, Tuesday, 17th May, 2011, P. 9

# 'नासा' काढणार अंतराळ याने मोडीत!

**जुनी झालेली अंतराळ याने व त्यांचा वाढत चाललेला देखभाल खर्च यांचा विचार करून 'नासा'ने आपल्या ताफ्यातील सर्व अंतराळ याने बाद करण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारी अवकाशात पाठविण्यात आलेल्या एन्डेव्हरचे हे अखेरचे उड्डाण असेल व त्यानंतर ते संग्रहालयात जमा होईल. आपल्या ताफ्यातील शेवटचे डिस्कव्हरी हे यानही नासा पुढील काही महिन्यांत बाद करणार आहे. यानंतर अमेरिका नवे अवकाश यान उभारणार नसून, अंतराळ मोहिमांसाठी खासगी कंपन्या व इतर देशांच्या यानांची मदत घेणार आहे. अमेरिकेची अंतराळ याने व ती बाद करण्याच्या 'नासा'च्या निर्णयाबद्दल...**

## अमेरिकेची अंतराळ याने

- चॅलेंजर, ॲटलांटिस, एन्डेव्हर, कोलंबिया व डिस्कव्हरी
- चॅलेंजर १९८६मध्ये उड्डाणानंतर सात अंतराळवीरांसह खाक झाले.
- कोलंबिया कल्पना चावलासह अन्य अंतराळवीरांना घेऊन पृथ्वीवर परत येत असताना १ फेब्रुवारी २००३ रोजी नष्ट झाले.
- एन्डेव्हर व डिस्कव्हरी कार्यरत आहेत, मात्र त्यांना 'रिटायर' करण्याची योजना.

## 'नासा' एकही यान ठेवणार नाही

- जुनी झाल्याने अंतराळ यानांचा देखभाल खर्च मर्यादेपलीकडे वाढला. त्यामुळे हा खर्च टाळून तो पैसा इतर प्रकल्पांत गुंतविण्याचा निर्णय नासाने घेतला आहे.
- अंतराळवीरांनी चंद्र आणि शक्य असल्यास मंगळावर जावे, यासाठी वेगळी तरतूद करण्याचा निर्णय तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी घेतला. मात्र, त्यासाठी नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशनला (नासा) नव्या अंतराळ यानाच्या बांधणीवरील सुमारे ४ अब्ज डॉलरचा खर्च कमी करण्यास सांगण्यात आले होते. विशेष म्हणजे, बराक ओबामा यांनी चंद्रावरील मोहिमाच बंद करून टाकल्या.
- एन्डेव्हरपाठोपाठ ॲटलांटिस अंतराळ यानही लवकरच शेवटची सफर करेल व त्यानंतर 'नासा'कडे एकही अंतराळ यान नसेल.
- ही सर्व अंतराळ याने संग्रहालयात जमा होणार.
- अंतराळ मोहिमा बंद झाल्यानंतर अंतराळात उभारलेल्या स्पेस स्टेशनचा उपयोग विज्ञानातील विविध प्रयोग करण्यासाठी केला जाणार. यामध्ये अंतराळात अधिक काळ वास्तव्य करण्यासाठी किंवा मंगळापर्यंत पोचण्यासाठी काय तयारी करावी यासारख्या प्रयोगांचा समावेश. या स्पेस स्टेशनवर जाऊन अनेक अंतराळवीर वास्तव्य करू शकतील.

## अमेरिका घेणार रशियाची मदत

- सध्याची अंतराळ याने मोडीत काढून भविष्यात नवे अंतराळ यान उभारले नाही, तर अमेरिकेतील अंतराळवीर अवकाशात जाणार कसे, हा प्रश्न उपस्थित केला जातो आहे. मात्र, अमेरिकेने या बाबतीत चक्क आपला सर्वांत मोठा प्रतिस्पर्धी रशियाची मदत घेण्याचे ठरविले आहे. रशियाचे सुएझ हे कॅप्सूल शटल स्पेस स्टेशनवर जाण्यासाठी प्रत्येक व्यक्तीसाठी ५ कोटी ६० लाख डॉलर भाडे आकारते, जे भविष्यात ६ कोटी ३० लाख डॉलरपर्यंत जाणार आहे. मात्र, अंतराळ यान उभारण्याच्या खर्चापेक्षा हा खर्च खूपच कमी असल्याने अमेरिका रशियाच्या यानातून आपल्या देशातील अंतराळवीरांना अवकाशात पाठविणार.
- खासगी कंपन्यांनी बनविलेली व्यावसायिक रॉकेट व कॅप्सूलचा वापर अंतराळवीरांना अवकाशात पाठविण्यासाठी करण्याचा पर्याय 'नासा' खुला ठेवणार.




शेवटच्या प्रक्षेपणापूर्वी एन्डेव्हर यानाचे घेतलेले छायाचित्र.